2017



# INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

International Recognition Multidisciplinary Research Journal

Volume - 7 | Issue - 3 | April - 2017

Impact Factor : 5.1651(UIF) 2230-7850


# 1896 मधील खानदेशातील दुष्काळ व सार्वजनिक सभेचे कार्य




प्राचार्य डॉ. पी.एस.सोनवणे

प्राचार्य डॉ. पी.एस.सोनवणे

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशीव देसले विज्ञान महाविद्यालय साक्री ता.साक्री जि.धुळे.



प्रस्तावना : भारत हा शेती प्रधान देश आहे या देशात दोन प्रकारचे दुष्काळ पडतात जास्त पाऊस पडला तर ओला दुष्काळ व कमी पाऊस पडला.............



Editor - In - Chief - H. N. Jagtap



Scanned with CamScanner

2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF) VOLUME - 7 | ISSUE - 3 | APRIL - 2017

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# “१८९६ मधील खानदेशातील दुष्काळ व सार्वजनिक सभेचे कार्य”

प्राचार्य डॉ. पी.एस.सोनवणे
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशीव देसले विज्ञान
महाविद्यालय साक्री ता.साक्री जि.धुळे.

## प्रस्तावना :



भारत हा शेती प्रधान देश आहे या देशात दोन प्रकारचे दुष्काळ पडतात जास्त पाऊस पडला तर ओला दुष्काळ व कमी पाऊस पडला तर कोरडा दुष्काळ सन ९६ मध्ये खानदेशात दुष्काळ पडला याचा फटका खानदेशातील जनतेला सोसावा लागलेला आहे. खानदेशतील जनतेला दिलासा देण्यासाठी कंपनी सरकारच्या काळात व ब्रिटिश सरकारच्या काळात काही उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत.

संकटे एकटी येत नसतात जणुकाही ती समुहानेच हल्ला करतात की काय कोण जाणे ! १८९६ च्या पावसाळ्यानंतर महाराष्ट्र व खानदेश दुष्काळाच्या जाळ्यात सापडला.१८७६ मधील दुष्काळाचा तडाखा सोसल्या नंतर १८९६ साली दुष्काळाचे नवे संकट आ वासून उभे राहिले. त्यातच प्लेगच्या साथीची मोठी आपत्ती आली [१].

## खानदेशातील दुष्काळ :-

सन १८९६ मध्ये ऑगस्ट महिन्याच्या अखेरपर्यंत खानदेशात चांगला पाऊस झाला. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने रब्बी पिके पुर्ण खानदेशात अजिबात झाली नाहीत. खानदेशात दुष्काळ जाणवू लागला त्यात भुसावळ तालुक्याचा एदलाबाद पेठा व जळगाव तालुक्यातील काही भाग[२] तसेच पच्छिम खानदेशातही काही भागात दुष्काळ पडला त्यात तापी व बुराई खोऱ्यातील प्रदेश आणि नंदुरबार शहराच्या उत्तर व दक्षिणेकडील भागावर दुष्काळाचा मोठा तडाखा बसलेला दिसतो[३].

दुष्काळ म्हटला की धान्याचा तुटवडा आलाच. महागाई इतकी वाढली होती की सामान्य जनतेला पेलवणारी नव्हती. सामान्य जनता शेतीवरच अवलंबुन असल्याने रोजंदारी नव्हती शेतकरी व शेतमजूर यांची स्थिती दयनीय होती दुष्काळ पडला म्हणजे ताबडतोब रोजंदारीची कामे सुरू करण्याची आजकाल सारखी पध्दती त्या काळी नसल्याने गरीब जनतेला दुष्काळाच्या भीषणतेला तोंड द्यावे लागत होते.

१८९६ हे वर्ष महाराष्ट्राच्या व खानदेशाच्या दृष्टीने दुर्दैवी वर्ष होते संपुर्ण महाराष्ट्र दुष्काळाची भीषणता अनुभवीत होता. खानदेशापेक्षा ही इतरत्र स्थिती भयानक होती पुण्याच्या केसरीतुन दुष्काळासंबंधीचे वर्णन करतांना केसरीकार म्हणतात “दुष्काळ असा खास पडला आहे हे सांगायलाच नकोच. गुरे कडब्याच्या किंमतीत विकू लागली व कडबा सोन्याच्या भावाने चालला आहे”[४] याच्या वरुन लक्षात येते की दुष्काळाची भिषणता किती भयानक होती. म्हणून गोपनीय अहवालात याची नोंद आढळते मुंबई इलाख्याच्या १८९६ वर्षाच्या गोपनीय अहवालात पुढील प्रमाणे नोंद आढळते “धुळे, पारोळा, जळगाव आणि भुसावळ भागात धान्य टंचाई मुळे दंगा होईल अशी भिती वाटते त्याला तोंड देण्यासाठी शासनाने सर्वतोपरीने सावधगीरीने उपाय योजले आहेत. या घटनेला राजकीय महत्व नाही परंतू या वर्षी खानदेशात अंशिक पिक आल्याने ही घटना म्हणजे येऊ घातलेल्या दुष्काळाचे चिन्ह होय”[५] हा अहवाल ५ ऑक्टोबर १८९६ वर्षाचा आहे दंगल होण्यासारखी परिस्थीती उद्भवली याचा अर्थ लोकांना दुष्काळाचे चटके सप्टेबर १८९६ पासून जाणवू लागले.

१८७६ वर्षाच्या दुष्काळाच्या अनुभवावरून ब्रिटिश सरकारने Famine Code तयार केले होते दुष्काळामुळे प्राणहाणी किंवा दंगे होत असतात तेव्हा सरकार या फिमेन कोडचा तात्परतेने किंवा सढळपणे उपयोग करीत नव्हते सरकार कडुन असभ्य दुर्लक्ष होऊ लागल्याने

टिळकांना राजकीय चळवळ करणे भाग पडले २० ऑक्टोबरच्या अंकापासुन फेमिन कोडचा आधार घेऊन लोकांनी आपल्या हक्कासे राहुन दुष्काळ निवारणाचे उपाय सरकारकडुन करवुन घेतले पाहिजेत अशी शिकवण देण्यात केसरीने सुरवात केली[६].

टिळकांच्या हाती नेतृत्व असलेल्या पुण्याच्या सार्वजनीक सभेने या कामात पुढाकार घेतला. सार्वजनीक सभेचे मुख्यात्यार-एजंट गावोगावी जाऊन प्रचार करु लागले पीक भरपूर नसेल व सारा भरण्याची कुवत नसेल तर सारा भरू नका असा प्रचार सुरू झाला.

सार्वजनीक सभेचे एजंट या नात्याने धुळ्याचे शंकर श्रीकृष्ण देव हे खानदेशात कार्य करु लागले दुष्काळाची भीषणकता व सारामाफीच्या चळवळीची माहिती देण्यासाठी १३ डिसेंबर १८९६ रोजी धुळे येथे धोंडगे शामराव गरूड यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली यावेळी सार्वजनीक सभेचे एजंट शं.श्री.देवांचे भाषण झाले खेड्यापाड्यात प्रचारासाठी जाणाऱ्यां व्यक्तींना दुष्काळ निवारण कायद्यातील (Famine Relif Code) तरतूदी त्यांनी समजावून सांगीतल्या आणि या कायद्यानुसार शासनाकडे कोणत्या मागण्या करता येऊ शकतात हेही त्यांनी विशद केले तसेच २६ डिसेंबर रोजी अशीच एक सभा शं. श्री. देव यांनी पारोळा येथे घेतली. तेथील जनतेला या कायद्यावीषयी व आपल्या हक्का विषयी जाणीव करून दिले[७].

सार्वजनीक सभा पूणे व्दारा योजनाबध्द रितीने काम सुरु होण्यापुर्वीच खानदेशात सारामाफीसाठी कलेक्टरकडे अर्ज पाठविण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. असाच एक प्रयत्न एरंडोल येथे झाला.होता १२ नोव्हेंबर १८९६ रोजी श.सा.कोटस्थाने , मुन्सीपल चेअरमन यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली या सभेत एक हजार सर्व जातीचे लोक उपस्थित होते सारामाफीसाठी ५०० सह्यानींशी एक एक अर्ज कलेक्टरकडे पाठविण्यात आला या कार्याला चालना देण्यासाठी म्हणून २१ नोव्हेबर १८९६ रोजी "एरंडोल तालुका असोशियेशन " ची स्थापना करण्यात आली[८].

गोपनीय अहवालात खानदेशाच्या डिस्ट्रीक मॅजिस्ट्रेटने अहवालाचे ११ जानेवारी १८९७ चे वृत्त नोंदलेले आहे. त्यावरुन खानदेशात दुष्काळ विरोधी व सारामाफीसाठी चाललेल्या चळवळीची व्याप्ती व चळवळ दडपूण टाकण्यासाठी शासनाने ठरविलेल्या धोरणाची माहिती लक्षात येते. ते लिहतात, अनेक तालुक्यात स्थानिक वकील रयतेच्या सभा घेत आहेत. रयतेकडुन येणाऱ्या अनेक अर्जातील साम्य लक्षात घेता एखाद्या मध्यवर्ती यंत्रणेकडून मजकूर सांगितला गेला असावा. मोठ्या प्रमाणात सारामाफी मिळावी हाच या सभांचा व अर्जांचा उद्देश दि हे सर्व घडवुन आणण्यामागे संघटकांचा दुहेरी हेतू दिसतो. एक म्हणजे अधिकाऱ्यांना पेचात टाकणे व दुसरा म्हणजे रयतेला चळवळी साठी तयार करणे. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट आपल्या अहवालात पुढे म्हणतात, सार्वजनीक सभेचे एजंट यांचेवर निगरानी ठेवण्यास ड्रिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ फोसिस यांना सांगितले आहे. साराचा पहिला हप्ता भारण्याची मुदत संपली आहे व जिल्ह्यातील या संदर्भातील वस्तुस्थितीची मला अध्यापावतो माहिती मिळालेली नाही परंतु धुळे तालुक्यातील काही, खेड्यांपासुन सारा भरण्याच्या विरोधात जनता संपाच्या पवित्र्यात आहे. अशा दांडगाई करणाऱ्या खेड्यातील वसूली त्या खेड्यातील काही श्रीमंत व्यक्तींच्या जमिनी जप्त करुन व त्या मालमत्येची विक्री करुन गोळा केली पाहिजे या धोरणाचा इतरांवर काय परीणाम होतो हेही बघता येईल[९] डिस्ट्रीक मॅजिस्ट्रेटच्या वरील नोंदीवरुन खानदेशात डिसेंबर १८९६ च्या महिन्यात सारामाफी साठी सर्वत्र सभा होत असल्याचे असे दिसुन येते ११ जानेवारी १८९७ या आठवड्याच्या अखेर वरील नोंद गोपनीय अहवालात नोंदलेली आढळते

भडगांव येथे ६ जानेवारी १८९७ रोजी जळगांव येथील रा.ब.काशिनाथ लक्ष्मण, माजी पोलीस इन्पेक्टर यांचे चिरंजीव गोविंद काशिनाथ यांचे अध्यक्षतेखाली सभा झाली जनतेने यावर्षी सारा माफीसाठी सरकारकडे अर्ज करावा असा उपदेश त्यांनी केला[१०]. जनतेला फिमेन कोड संदर्भात मार्गदर्शन केले व सारामाफीसाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करावे असे त्यांनी प्रतिपादन केले.

दुष्काळाच्या संदर्भात धुळे येथे १६ जानेवारी १८९७ रोजी सभा झाली सार्वजनीक सभेच्या अध्यक्षांनी फिमेन कोड शेतकऱ्यांना समजावून सांगण्यासाठी जे कार्य केले त्याचा आढावा घेण्यासाठी ही सभा बोलविण्या मागचा हेतू होता ज्यांचे उत्पन्न आसपास बारा आणे आहे त्यांनी सारा भरावा व ज्यांचे उत्पन्न त्यापेक्षा कमी आहे. त्यांनी सारा भरू नये असे अध्यक्षांनी सांगीतले कलेक्टरकडे अर्ज करण्यात काहीच अर्थ न राहिल्याने, दादमागण्यासाठी जनतेने सरकारकडे अर्ज करावा अशा अर्थाची व देशपांडे, परांजपे, यांच्या सहींची पत्रके या प्रसंगी वाटण्यात आली."

सार्वजनिक सभेचे मूख्य या नात्याने शंकर श्रीकृष्ण देवांनी १४५ खेड्यात छापील कार्ड पाठवुन धुळे येथे दि.१९ जानेवारी १८९७ रोजी शेतकऱ्यांची एक सभा बोलावली सभेत देवांचे दुष्काळासंबंधी भाषण झाले केसरीतील वृत्तानुसार सभेच्या शाखा प्रत्येक तालुक्यात जागोजागी स्थापन झाल्या[१२].

ही चळवळ जसजशी फैलाऊ लागली तसतसे सरकारी अधिकारी ही अस्वस्थ झाले ही चळवळ दडपशाही च्या मार्गाने का होईना दडपुण टाकण्याचा सरकारचा इरादा होता दि.२ फेब्रुवारी १८९७ रोजी दोन-अडीच हजार शेतकरी सारामाफीचा अर्ज घेउन धुळे येथे कलेक्टरकडे गेले परंतू जुलमी अधिकाऱ्यांनी जनतेच्या न्याय मागण्यांचा विचार न करता पोलीसांकडुन लाठीमार करून त्यांना पिटाळून लावले[१३].

या चळवळी मुळे शेतकऱ्यांमध्ये बरीच जागृती झाली सरकारने कायद्याचा आधार घेऊन संघटितपणे चळवळ केल्यास कायदा होवू शकतो याचा वस्तुनिष्ठ पाठ शेतकऱ्यांना मिळाला इ.स. १८७६ च्या दुष्काळाच्या अनुभवा वरून मुबंई सरकारने दुष्काळी कामे सुरु केली ही कामे सतत १४ महिने चालू होती एप्रील १८९७ मध्ये दुष्काळ कामावर काम करणाऱ्यांची संख्या ३६५६० पर्यंत जाऊन पोहचली[१४].

संदर्भ


१. पो.अ.इ.१८९६ परिच्छेद-२९२ पान क्र.८०
२. जळगाव गॅझेट -१९६२ पा.३४२
३. धुळे गॅझेट इ १९७४ पा. ४४०-४४१
४. लोकमान्य टिळक चरित्र (पुर्वार्ध ) ले. न.चि.केळकर पा.५११
५. पो.अ.ई. १८९६ परिच्छेद -१३३९ पा.३२३
६. लोकमान्य टिळक यांचे चरित्र (पुर्वार्ध ) ले. न.चि.केळकर पा.४०१
७. लोकमान्य टिळक यांचे चरित्र (पुर्वार्ध ) ले. न.चि.केळकर पा.४०१
८. भारतीय इतिहास संशोधन मंडळ पुणे - खंड -७. पा.१७५
९. पो.अ.ई. १८९७ परिच्छेद-१४३ पा.३१
१०. पो.अ.ई. १८९७ परिच्छेद-१४३ पा.३२
११. पो.अ.ई. १८९७ परिच्छेद-१४३ पा.३२
१२. भारतीय इतिहास संशोधन मंडळ पुणे - खंड -१. पा.१७४
१३. भारतीय इतिहास संशोधन मंडळ पुणे - खंड -१. पा.१७४
१४. खानदेश गॅझेट खंड -१२ (ब) पा.४




Scanned with CamScanner